## प्रकरण २ रे.

## शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवन चरित्र.


२.१ प्रस्तावना.

२.२ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे वंशज.

२.३ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे बालपण व शिक्षण.

२.४ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे कौटुंबिक जीवन.

२.५ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे राजकीय व सामाजिक कार्य.

२.६ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचा रयत शिक्षण संस्थेतील प्रवेश व कार्य.

२.७ श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना.

२.८ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवनातील कांही ठळक घटना.

२.९ समारोप.

संदर्भ


::::::::::::::::

२.१ प्रस्तावना -

या शोध निबंधात अभ्यासकाने शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी माध्यमिक, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, वसतिगृह चळवळ, यांच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी "ज्ञान, विज्ञान, सुसंस्कार" या तात्त्विक विचारांचा मागोवा घेतला आहे. बापूजींनी रयत शिक्षण संस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बरोबर दहा वर्षे निष्ठेने व परिश्रम पूर्वक काम केल्यानंतर कांही तात्त्विक मतभेदामुळे ते रयत शिक्षण संस्थेच्या कार्यातून बाहेर पडले. त्यानंतर अल्पावधीत त्यांनी "श्री स्वामी विवेकानंद शिक्षण" संस्थेची स्थापना केली.

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील १० जिल्ह्यातील ग्रामीण भागात बहुजन समाजासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य केले. बापूजींनी हे समाज जागृतीसाठी केलेले शैक्षणिक कार्य अभ्यासकाला अत्यंत महत्त्वाचे वाटले. स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष करून या कार्याकडे ते का वळले? लहानपणी शिक्षण घेतांना, नोकरी करीत असतांना त्यांच्यावर विशिष्ट व्यक्तींचा परिणाम कसा झाला यासाठी बापूजींचा जीवनवृत्तांत अभ्यासकाने येथे दिला आहे.

## २.२ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे वंशज. -

इसवीसनाच्या ६ व्या शतकात चालुक्य घराण्याचे राज्य महाराष्ट्रात स्थापन झाले. त्यांचा पहिला राजा जयसिंह होता. त्याच्या वंशजानी इसवीसन ११८९ पर्यंत राज्य केले. चालुक्य घराणे पुढे साळुंखे या नावाने महाराष्ट्रात प्रसिध्द झाले. साळुंखे घराण्याच्या पाटणकर शाखेचा मुळ पुरुष जोत्याजीराव याला विजापूर बादशहाकडून पाटण परगाण्याची जाहागिरी मिळाली होती.

याच साळुंखे घराण्याच्या वंशवृक्षाविषयी माहिती देताना डॉ. गजानन सुर्वे आपल्या " शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य" या ग्रंथात पुढे लिहतात-

> " साळुंखे घराण्याचा मुळपुरुष केदारजी, केदारजीचा पुत्र मानाजी, मानाजीचा पुत्र बाळाजी, बाळाजीचा पुत्र कृष्णाजी, कृष्णाजीस दोन सुपुत्र होते. एक ज्ञानोजी व दुसरे तुकाराम, ज्ञानोजीस एकंदर सात अपत्ये होती. त्यापैकी गोविंद हा ज्ञानोजीचा सर्वात धाकटा मुलगा हेच आपले बापूजी साळुंखे होत. "१.

साळुंखे घराण्याचा वंशवृक्ष -

केदारजी
-- मानाजी
--- बाळाजी
कृष्णाजी
ज्ञानोजी    तुकाराम
-- गोविंदराव
[सर्वात धाकटा मुलगा बापूजी साळुंखे.]

## २.३ बापूजी साळुंखे यांचे बालपण व शिक्षण -

### बालपण -

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात रामापूर नावांचे एक लहानसे गांव चिपळूण-पुणे हमरस्त्यावर वसले आहे. रामापूरच्या पूर्वेकडील बाजूने कोयना नदी वाहाते. रामापूरचे वैभव म्हणजे साळुंखे घराणे. या साळुंखे घराण्यात १ जून १९१९ रोजी गोविंदाचा जन्म झाला. गोविंदाच्या वडिलांचे नांव ज्ञानोजी व आईचे नांव तानुबाई , गोविंद एक वर्षाचा असतानांच आई तानुबाई निवर्तली आणि गोविंद मातृप्रेमाला पोरका झाला. पण वडिलांचे त्यांच्यावर अपार प्रेम होते. चार वर्षाचा असतांना गोविंद पंडू रोगाने आजारी पडला. ज्ञानोजी स्वत: वैद्यराज होते. गोविंदाला त्यांनी लवकरच आजारातून बरे केले. गोविंदाचे आजोबा कृष्णाजी व पणजोबा बाळाजी हे ईश्वरभक्त होते. ते दररोज हरिपाठ म्हणायचे सहाजिकच हा वारसा पुढे ज्ञानोजीकडे आला. ज्ञानोजी नित्यनियमाने देवपूजा करायचे त्या वातावरणाचा व वंशपरंपरेचा गोविंदाच्या बालमनावर परिणाम झाला. वयाच्या पाचव्या वर्षापासूनच त्याने देवपूजा करण्याचा अट्टाहास धरला. "ईश्वर आपले भले करतो." ही भावना बाल गोविंदाच्या मनात रुजली. घरातील धार्मिक वातावरणाचा गोविंदावर प्रभाव पडला होता. ईश्वर भक्तीचा नाद वाढू लागला तास न तास तो देवपूजेत तल्लीन होत असे. त्याबरोबर त्याचा गायनाचा नाद ही वाढू लागला. या संबंधी डॉ. गजानन सुर्वे म्हणतात -

" ज्ञानोबा सुरेल आवाजात 'प्राण्या राम भजवारे, हे भजन गात असत. गोविंदाने देखील हे भजन पाठ केले. एवढेच नव्हे तर वयाच्या ८ व्या वर्षीच सत्यनारायणाची पोथी ही गोविंदाने पाठ केली. "२.

गोविंदा लहानपणापसूनच हुशार व चौकस बुध्दीचा होता. धार्मिक संस्कार त्याच्यावर घरातच घडत होते. त्यामुळे त्याचे मन श्रध्दाळू बनू लागले. या श्रध्दाळू भावनेत वाढ होत गेली व दीनदुबळ्या गरीब लोकाविषयी त्याच्या मनात प्रेम निर्माण होऊ लागले. हीच भावना पुढे गोविंदाला शिक्षण प्रसार कार्य करण्यास सहाय्यभूत ठरली.

गोविंद पंडू रोगाच्या आजारातून बरा झाल्यावर लगेच आणखी एक जिवावरचे संकट त्याच्यावर आले. एकदा कोडोली नदीच्या तीरावर सदाशिव व गोविंद आपले स्वत:चे कपडे धूत बसले होते. गोविंदाची गंमत करावी या हेतूने सदाशिवाने त्याला नदीत ढकलले नदीत पाणी जास्त असल्याने तो गटांगळ्या खाऊ लागला. गोविंदाच्या जीवावर बेतले होते. पण सदाशिवाने त्याला वाचवले. शाळेत जाण्यापूर्वीच ज्ञानोजीनी गोविंदाला लिहावयाला वाचावयाला शिकविले होते. बालपणीच शिस्तीचे संस्कार ज्ञानोजीनी गोविंदा मध्ये निर्माण केले होते. बालपणापासूनच तो निर्भयी होता.

शिक्षण -

वयाच्या ८ व्या वर्षीच गोविंद शाळेत जावू लागला. त्याने इन्फट व पहिली एकाच वर्षात पूर्ण केले. ज्ञान प्रियतेचे बाळकडू लहानपणीच गोविंदाला मिळाले होते. गुरुविषयी आदर व नितांत श्रध्दा त्याच्या मनामध्ये होती.

गोविंदा शिकत असतांना त्याच्या हुशारी बद्दलचे वर्णन करतांना प्राध्यापक बी.डी.पाटील आपल्या " डॉ. बापूजी साळुंखे : व्यक्ती कार्य आणि आठवणी, या पुस्तकात लिहतात -

> " कुशाग्र बुध्दीचा बालवीर गोविंदा चुटकीसरसी तोंडी गणिते सोडवी, त्याच्या गुणामुळे व कुशाग्र बुध्दीमुळे त्याने दुसरी व तिसरी एकाच वर्षात पुरी केली व आपल्या गुरुजींची शाबासकी मिळविली. "1

गुरुजीविषयी आस्था, नम्रता ज्ञानार्जनाची चिकाटी, धाडस इत्यादी गुणामुळे गोविंदा गुरुजींचा आवडता विद्यार्थी बनला. गुरुजी त्यांच्यावर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम करु लागले. गोविंद चवथ्या इयत्तेत शिकत असतांना त्याचा जिवलग मित्र रघुनाथ शेंडे याच्यासाठी खोटे बोलावे लागले. पोलीसांनी त्याची खरपूस हजेरी घेतली. पण त्या संकटातून गोविंदाने आपल्या मित्राची मोठ्या शिताफीने सुटका केली. तो इयत्ता ५ वी मध्ये शिकत असताना नायकवाडी नावाचे आदर्श शिक्षक त्याला लाभले. त्यांच्याकडून व्यवहारी ज्ञान त्याने आत्मसात केले. परंतु त्याचवेळी नायकवाडी गुरुजींची बदली झाली. त्यांच्या जागेवर मास्लकर गुरुजी आले. त्याना काही वाईट सवयी होत्या. वर्ग बांधवाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या हितासाठी अन्यायाविरुध्द दाद मागण्यासाठी त्यांनी मास्लकर गुरुजींच्या विरुध्द मुख्याध्यापकाकडे तक्रार केली. गोविंदाच्या समर्थ नेतृत्वाची ती नांदीच ठरली. ज्ञानोजीने उतार वय गाठले होते शिक्षण घेत असतांना गोविंदाला केवळ पित्याचाच आधार होता. गोविंद सातवी मध्ये शिकत असताना ज्ञानोजी मरण पावले. पित्याच्या मृत्यूचा त्याच्या मनावर खोलवर परिणाम झाला. तो त्या वर्षी नापास झाला.

वडील वारले असताना शिक्षणात अपयश आले असतांना देखील गोविंदाने धीर सोडला नाही. त्यांची शिकण्याची दांडगी इच्छा होती. तो पुन्हा इयत्ता सातवीच्या वर्गात बसू लागला. गुरुजींनी त्याला विचारले, " परवानगी न घेताच तू सातवीच्या वर्गात का बसलास? या प्रश्नाचे उत्तर नम्र गोविंदाने धाडसाने दिले. त्याच्या नम्रतेविषयीचे वर्णन प्राध्यापक बी.डी.पाटील पुढीलप्रमाणे करतात.

> " गोविंद म्हणाला , मी सातवीच्या वर्गात बसतो याचा गुरुजींना अभिमान वाटेल असे मला वाटले पण गुरुजी रागावलेले दिसतात मी त्यांची क्षमा मागतो. " ४.

यावरुन गोविंदाची ज्ञानलालसा, चिकाटी व नम्रता हे गुण दिसून येतात वडील वारल्यामुळे गरीबीत अधिकच भर पडली होती. तरी देखील गोविंदाने सातवी परिक्षेत चांगले यश मिळविले.

## शिक्षणासाठी गाव सोडले -

गोविंद सन १९३३ मध्ये सातवीची परीक्षा पास झाला. रामापुरात पुढील शिक्षणाची सोय नसल्याने त्याने इस्लामपूर येथील आपल्या थोरल्या भावाकडे शिकावयास जायचे ठरविले. पैशाअभावी पाटण ते इस्लामपूर हा दूरचा प्रवास गोविंदाने पायी केला. इस्लामपूर येथे गोविंदाचे हायस्कूलचे शिक्षण चालू असतांना त्याचे बंधू इस्लामपूर सोडून गेले. त्यामुळे गोविंदाच्या शिक्षणाची अबाळ होवू लागली पण श्री. षण्मुख कापसे यांच्या रुपाने गोविंदाला देव भेटला. कापसे त्याच्या शिक्षणाची काळजी घेवू लागले. शिक्षण घेतांना वार लावून जेवण घ्यावे लागले. त्याविषयीची माहिती देताना प्राचार्य जे. बी. कुंभार आपल्या " चैतन्यमय व्यक्तीमत्व : शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे" या लेखात लिहतात-

> " इस्लामपूर येथे हायस्कूलचे शिक्षण घेत असताना गोविंदाच्या जेवण्याची व्यवस्था वारावर लावून दिली होती. कांदेकर यांच्या खाणावळीत दोनवार, धोंडूपाटील यांचेकडे एकवार, बळवंतराव पाटील यांचेकडे दोनवार, रामभाऊ गुरव यांचेकडे एकवार असे वार लावून दिले होते." 5.

यावरून गोविंदाला शिक्षण घेताना किती कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागले याची कल्पना येते. तसेच परिस्थिती माणसाला घडविते हे यावरून समजून येते. त्यांच्या प्रतिकूल परिस्थितीवर प्रकाश टाकताना प्राध्यापक बी.डी. पाटील लिहतात -

> " हायस्कूलला शिकत असताना गोविंदाचा मासिक खर्च फक्त दीड आणा होता. दोन पैसे केस कापायला, तर चार पैसे धुलाईच्या साबणाला." 6.

अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गोविंदाने सन १९३९ मध्ये मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. गोविंदाचे बंधू परशरामचे व राष्ट्रवीर चे संपादक शामराव देसाईचे संबध सलोख्याचे असल्याने शामराव देसाईंच्याकडून गोविंदाला राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे प्रवेश मिळाला. याच महाविद्यालयातील गरीब होतकरु विद्यार्थ्यांना साहाय्य करणारे प्राध्यापक आप्पासाहेब पवार यांच्या सहकार्याने गोविंदाची राहाण्याची सोय प्रिन्स शिवाजी बोर्डिंगात झाली. गोविंदाची अभ्यासाची चिकाटी, अविरत कष्ट करण्याची तयारी पाहून डॉ. पवार यांचे गोविंदावर पितृवत प्रेम जडले. गोविंद डॉ. पवारांना त्यांच्या संशोधन कार्यात मदत करु लागला. त्यामुळे डॉ. पवारांना गोविंदाबद्दल अधिक जिव्हाळा वाटू लागला. माता पित्याला वंचित झालेल्या पुत्राला दुसरा पिता मिळाला. शिक्षण चालू असतांना डॉ. आप्पासाहेब पवारांच्या प्रोत्साहनामुळे गोविंदरावांना संशोधक, राजगुरु व सल्लागार अशा त्रिविध भूमिका कराव्या लागल्या. त्याचवेळी देशात स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहू लागले होते.

त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीस साथ देण्यासाठी त्यानी सन १९४२ च्या क्रांतीलढयात स्वातंत्र्यसैनिक म्हणून भाग घेतला. हे करीत असतांना त्यांनी अभ्यासाकडे दुर्लक्ष केले नाही. सन १९४५ मध्ये गोविंदराव राजाराम महाविद्यालयात बी.ए.च्या वर्गात शिकत असतांना त्यांना धामणस्कर शिष्यवृत्ती मिळत होती. त्यांच्या हुशारीबद्दल त्यांना कॉलेजमध्ये भरावयाच्या फी मध्ये सवलत मिळाली. या संबंधी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर एक नवीन आदर्श निर्माण केला या संबंधी उदाहरण देतांना संभाजीराव पाटणे लिहतात -

> " संस्कृत विषयातील प्राविण्याबद्दल त्यावेळचे प्राचार्य बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी गोविंदरावाना कॉलेजमधील सर्व फी माफीची सवलत जाहीर केली. परंतु धामणस्कर शिष्यवृत्ती मिळत असल्याने त्यानी फी माफ सवलतीचा त्याग केला. " ७

यावरुन गोविंदरावाच्या विद्यार्थी दशेतील त्यागी व अभ्यासू वृत्तीचे दर्शन घडते.

## बापूजी नामकरण -

गोविंदराव प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये शिकत असतांना महात्मा गांधीच्या"साधी राहाणी व उच्चविचार सरणी" या तत्वाचे पालन करीत होते. गांधीजींच्या विचारांना बोर्डिंगमधील विद्यार्थ्यात होणा-या वादविवादामधून चालना देत असत. फावल्या वेळात गोविंदरावाना इतर विद्यार्थ्यांची थट्टा मस्करी करण्याचा नाद होता. या थट्टा मस्करी करण्याच्या छंदातून गोविंदरावांचे ते बापूजी कसे झाले या विषयीचे वर्णन करताना प्राध्यापक डॉ. एस.एस. भोसले आपल्या महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा या ग्रंथात लिहतात-

" बोर्डिंग मधील विद्यार्थी आर.डी. पाटीलांची सावरकरी टोपी घालण्याची ऐट पाहून गोविंदराव त्याना चिडवायचे वा। खरच की, हो तुम्ही अगदी सावरकर शोभता? त्यावर आर.डी.पाटील म्हणायचे तुम्ही तर महात्मा गांधीच शोभता की हो।" ८.

त्यावेळ्यापासून बोर्डिंग मधील विद्यार्थी त्याना बापूजी म्हणूनच संबोधू लागले. आज त्यांचे सर्व आप्तेष्ट, मित्र, हितचिंतक त्यांना बापूजी म्हणूनच ओळखतात. बापूजी या नावाला शोभेल अशीच त्यांची कृती होती.

२.४ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे कौटुंबिक जीवन -

गोविंदावर मुलाप्रमाणे प्रेम करणा-या डॉ. आप्पासाहेब पवारांना गोविंदाचा विवाह आपणच करावा असे वाटले. गोविंदासाठी त्यांनी एक स्थळ सुचविले. , " मी आश्रीत आहे, गरीब आहे. अशा स्थितीत बडयांच्या कन्येशी कसा विवाह करायचा?" असे गोविंदाने नम्रपणे डॉ. पवाराना सुचविले. आपल्याशी जुळवून घेणा-या अशा स्त्रीशीच विवाह करायचा असे गोविंदरावानी ठरविले होते. यावरुन त्यांचा दूरदर्शीपणा दिसून येतो. गोविंद रावाचे थोरले बंधू परशुराम यांनी गोविंदरावासाठी एक सुस्वरुप, सुस्वभावाची मनमिळाऊ, साध्या परिस्थितीतील मुलगी शोधली. बेळगांवच्या नानासाहेब पाटलांची ती कन्या, तिचे नांव सुशिला. वधूपक्षाचे आर्थिक शोषण करावे, भरपूर हुंडा घ्यावा अशी त्यांची विचारसरणी नव्हती. १५ डिसेंबर १९४० रोजी अगदी साध्या पध्दतीने त्यांचा विवाह सुशिला बरोबर झाला. लग्नानंतर डॉ. अप्पासाहेब पवारांच्या प्रोत्साहानामुळे त्यांच्या संशोधन कार्यास मदत करण्यासाठी त्यांना सोंडूर येथे जावे लागले. सोंडूर संस्थानचे महाराज यशवंतराव घोरपडे यांनी डॉ. पवार यांचेकडे गोविंदराव बद्दल राजगुरु म्हणून काम करण्याविषयी विचारले. त्यामुळे पवार साहेबांनी संशोधक व राजगुरु म्हणून

काम त्यांच्यावर सोपविले या कामगिरीमुळे त्यांना नवीन वैवाहीक जीवनाचा त्याग करावा लागला. त्यानंतर गोविंदराव भूमिगत चळवळीत सामील झाले. त्यावेळी ते वाळवे तालुक्यातील पडवळवाडी येथे धोंडूजी कोकाटे यांचे वाडयात राहात होते. भूमिगत चळवळीमुळे त्याना नवीन वैवाहीक जीवन उपभोगता आले नाही. स्वातंत्र्याच्या लालसेमुळे सोंडूर येथील राजगुरूची नोकरी त्यांनी सोडली. त्यामुळे आर्थिक ओढाताण सुरु झाली. भूमिगत कार्यकर्त्यांना फक्त १५ रुपये दरमहा मानधन मिळत होते. तेवढया रकमेवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांना भागवावा लागे. स्वातंत्र्य चळवळीत सामील झाल्यामुळे तसेच धार्मिक विधी, सत्यनारायण पूजा यासारखे सामाजिक कामासाठी त्यांना निरनिराळ्या गांवी जावे लागत असे. त्यामुळे घरातील अडचणी व संसार सुखाकडे त्यांचे लक्ष्य नव्हते. एकदा त्यांची जेष्ठ कन्या अरुणा आजारी पडली होती. पण अशा अडचणीच्या वेळी सुध्दा गोविंदराव बाहेरगांवीच होते. अशा वेळी सुशीलाबाईचे हाल होत, कुटुंबात रमण्यास त्यांना वेळ मिळत नसे. लहानपणापासून त्यांच्यावर धार्मीक संस्कार झाल्याने व समाजकार्याला वाहून घेतल्याने कौटुंबिक सुखाचा त्याना त्याग करावा लागला.

गोविंदरावाच्या कौटुंबीक जीवनात अनेक कठीण प्रसंग वारंवार येत असत. त्याविषयी बी.सी. थोरात सांगतात -

> " गोविंदराव रूकडीस राहात असतांना चोरटयांनी त्यांच्या घरावर हल्ला केला. खुंटीवरील बंदूक आण, अशी पत्नीस त्यांनी जोरात हाक मारली त्यामुळे चोर पळून गेले. यावरून त्यांचा प्रसंगावधान हा गुण दिसून येतो. आणखी एका कठीण प्रसंगाविषयी बी.सी. थोरात सांगतात 'पाटण तालुक्यातील माजगांव या गांवी कांही व्यक्तींनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला पण ते या प्रसंगातून बचावले. "१.

संस्थेच्या कामाच्या व्यापामुळे त्यांना असे नेहमी परगांवी हिंडावे लागे त्यामुळे संसार सुख उपभोगता आले नाही.

त्यांच्या शिस्तबध्द आणि कठोर स्वभावामुळे जरी ते बाहेर गांवी गेले तरी त्यांचा मुलावर अप्रत्यक्ष वचक होता. सुशील अशी पत्नी मिळाल्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन यशस्वी झाले. गोविंदरावांना अभयकुमार, शरद, दिपक, अशी तीन मुले व अरुणा, सुधा, विद्या ह्या तीन मुली होत्या. ह्या मुला मुलींना सुशिक्षित करण्याचे काम सुशिलाबाई-नीच केले. एकंदरीत गोविंद रावाचे कौटुंबिक जीवनाकडे दुर्लक्ष झाले.

२.५ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे राजकीय व सामाजिक कार्य.

राजकीय कार्य -

डॉ. आप्पासाहेब पवार यांना सोंडूरच्या राज घराण्याचा इतिहास लिहावयाचा होता. त्यासाठी सोंडूर संस्थानच्या राज घराण्याविषयी माहिती असणारी कागदपत्रे, हस्तलिखीते, जमा करण्याचे काम गोविंद-रावावर डॉ. पवारानी सोपवले. सोंडूरच्या इतिहास संशोधन कार्यात डॉ. पवारांना त्यांनी चांगल्या प्रकारे मदत केली. या कामगिरीबद्दल सोंडूर संस्थानचे महाराज यशवंतराव घोरपडे यांनी गोविंदरावाबद्दल राजपूत्रांना शिकविण्यासाठी मागणी घातली. डॉ. पवारांच्या आज्ञेवरुन त्यानी सोंडूर येथे राजगुरु म्हणून काम करण्याचे स्विकारले. शिक्षकाचे काम चांगले केल्याबद्दल महाराजांचे सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्याच सुमारास देशात स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहू लागले होते. राष्ट्रीय कार्यात आपण ही हातभार लावावा असे त्यांनी ठरविले व इस्लामपूरचे तरुण क्रातीकारक नागनाथ नायकवाडी यांच्या मार्गदर्शना-खाली भूमीगत चळवळीत भाग घेतला. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारात त्यांनी न्यायदानाचे काम पाहिले. क्रांतीवीरांनी विद्यार्थी संघटनेचे काम गोविंदराव यांच्यावर सोपविले त्यांच्या क्रांती लढयातील कार्याविषयीचे वर्णन संभाजीराव पाटणे पुढीलप्रमाणे करतात.

> " क्रांतीकारकांचा सातारा, भूमिगत चळवळ उभारून ब्रिटीश सत्तेला हादरे देत होता. विद्यार्थी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा बापूजी साळुंखे यानी संभाळली. त्यांचे सहकारी क्रांतीकारक इंग्रज सोलजर्सच्या हातावर तुरी देऊन बेळगांव भागात निसटले. " १०.

तरूण तडफदार नेते बॅरिस्टर नाथ पै व बापूजीनी अनेक गुप्त बैठका घेतल्या. बेळगांव ते खानापूर भागात सभा गाजविल्या व उत्तेजनपर व्याख्यानाद्वारे तरूणांना प्रभावित केले. त्यांनी गांधीजींच्या चलेजाव चळवळीस तीव्र स्वरूप प्राप्त करून दिले. त्यावेळी त्यांचे भूमिगत चळवळीचे कार्यालय वाळवे तालुक्यातील पडवळ वाडीत होते. शिराळा पेट्यातून त्यानी भूमिगताचे काम उत्तम प्रकारे पार पाडले. सन १९४६ मध्ये बापूजीनी सातारा जिल्हा विद्यार्थी कॉंग्रेसची परिषद भरविली व त्याचे अध्यक्ष म्हणून सुभाषचंद्र बोस यांना निमंत्रित केले. तसेच पुढील कामाविषयीची आखणी करून घेतली. सन १९४२ च्या क्रांती लढ्यातील प्रसंग व समस्या त्यानी स्वत: अनुभवल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी "सातारा जिल्ह्याचा क्रांती इतिहास" हे पुस्तक लिहले. त्यामध्ये क्रांती कारकांच्या अनेक रोमहर्षक कथा लिहून जनतेला क्रांती लढ्यात सहभागी होण्यास उत्तेजन दिले.

<u>सामाजिक कार्य -</u>

" स्वत: शिकावे व इतरांना शिकवावे " या विचाराने प्रेरित झालेल्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगातील कांही विद्यार्थ्यांच्या सहकार्याने समाजाच्या बांधिलकीची जाणीव ठेवून इस्लाम पुरात बापूजीनी "श्रीराम समाज सेवा मंडळाची" स्थापना केली. तेथे दोन वर्ष विद्यार्थ्यांना मोफत शिकवण्याचे काम केले. बहुजन समाज बहुसंख्येने अशिक्षीत आहे. त्या समाजाला सुशिक्षीत केल्याशिवाय समाजाची जागृती होणार नाही. हे बापूजीनी जाणले. समाजातील अनेक चालीरिती अंधश्रध्दा या विरुध्द

त्यांनी आवाज उठविला जातीभेद निर्मूलन प्रचारार्थ संत गाडगे बाबांच्या अस्पृश्यता निवारण मोहिमेत सहभागी होवून ठिकठिकाणी हिंडले. त्याकाळी ब्राम्हणाचे वर्चस्व असल्याने धार्मिक विधी व पुजाअर्चासारखे विधी ब्राम्हणानीच करावेत ही मक्तेदारी नष्ट करण्यासाठी बापूजी स्वत: घरोघरी हिंडून सत्यनारायणाची विनामूल्य पूजा अर्चा करु लागले. लग्न कार्यातील इतर धार्मिक विधीही बापूजी करु लागले. समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे काम करु लागले. अशा रितीने त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले. खेडयापाडयातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. एक लाख रुपयांचा कर्मवीर गौरव निधी जमा करण्याच्या कार्यास वाहून घेतले. बापूजीनी शिक्षण प्रसाराद्वारे समाजाची जागृती केली. बापूजीचे शैक्षणिक कार्य सामाजिक कार्याशी पूरक असेच होते.

२.६ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचा रयत शिक्षण संस्थेतील प्रवेश व कार्य -

बापूजींच्या सन १९४२ च्या क्रांती लढयातील तेजस्वी कार्याने भाऊराव पाटील आकर्षित झाले होते. तसेच एक लाख रुपयाचा निधी जमा करण्याचे काम बापूजीनी चिकाटीनी व जिद्दीने केले होते. सहाजिकच रयत शिक्षण संस्थेत त्यांची सातारा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यालयात शिक्षक म्हणून नेमणूक झाली. आणि रयत शिक्षण संस्थेत त्यांचा प्रवेश पक्का झाला. त्यानंतर २७ नोव्हेंबर १९४८ रोजी कर्मवीरांना गौरव निधी अर्पण करण्याचा कार्यक्रम घडवून आणला. त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन शैलीमुळे ते सातारयातील सयाजीराव विद्यालयात प्रसिध्द झाले. त्यावेळचे महाराष्ट्राचे गृहमंत्री मोरारजी भाई देसाई यांनी सातारा येथील आपल्या भाषणात भाऊराव पाटील यांचेवर आरोप केले हे बापूजीना सहन झाले नाही व त्यानी त्या सभेतच मोरारजीना फटकावले या प्रसंगाचे वर्णन करताना भाई माधवराव बागल म्हणतात -

> " बाजी प्रभूच्या जिद्दीने बापू साळुंखे जनसमुदायातून एकदम उसळी मारुन व्यासपिठावर येवून उभे राहिले. व त्वेषाने ओरडले : मुरारजी भाऊरावांच्याबद्दल उच्चारलेला शब्द परत घ्या, बेजबाबदारपणे आरोप करु नका." ११.

यावरुन बापूजींचे धाडस व स्वामीनिष्ठा यांचे दर्शन घडते. महाराजा सयाजीराव विद्यालयातील नोकरी उत्तम प्रकारे सांभाळून रयत शिक्षण संस्थेच्या इमारत निधीसाठी कोल्हापूर, पुणे, मुंबई वगैरे ठिकाणी हिंडून देणग्या गोळा करण्याचे काम निष्ठापूर्वकपणे त्यांनी पार पाडले. भाऊराव पाटील यांचा बापूजींच्या कर्तत्वाबद्दल दांडगा विश्वास होता. त्याच्या पुष्ठ्यार्थ डॉ. एस.एस. भोसले यांनी आपल्या महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग आणि परंपरा या पुस्तकात पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे.

> " सन १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाऊराव पाटील यांच्याकडे बापूजी साळुंखे यांना राजकारणासाठी आमच्याकडे द्या अशी मागणी केली. यावर भाऊरावांनी त्वरीत उत्तर दिले ते म्हणाले, " पाहिजे तर मी राजकारणात येवू शकेन पण साळुंखे यांना मी राजकारणासाठी देवू इच्छित नाही ते संस्थेचे काम चांगल्याप्रकारे पुढे नेवू शकतील." १२.

बापूजींच्यावर सोपविलेले कोणतेही काम ते आत्मीयतेने व जिद्दीने करीत. म्हणून त्यांची नेमणूक मुख्याध्यापक म्हणून महात्मा गांधी विद्यालय लकडी येथे केली. या हायस्कूलच्या वाढत्या विस्तार कार्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी हिंडून लोकवर्गणी जमा केली. विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून अल्पावधीत हायस्कूलची इमारत पूर्ण केली. या हायस्कूलसाठी त्यांनी सन १९४९ मध्ये वसतीगृह सुरु केले. त्यासाठी करमणूकीच्या कार्यक्रमाद्वारे निधी जमा केला. तसेच हायस्कूलचा उजाड माळ त्यांनी विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने फुलविला. हायस्कूलच्या शेतीच्या उत्पादनातून रयत शिक्षण संस्थेला दर वर्षी पाच हजार रुपये मिळवून दिले. या हायस्कूलचा बोर्ड परीक्षेचा निकालही शंभर टक्के लावून दाखविला. तसेच सन १९४५ ते १९५५ पर्यंत १० वर्षे रयत शिक्षण संस्थेची जडणघडण व भरभराट होण्यात घालविली.

## २.७ श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना.

संस्थेची स्थापना - बापूजी साळुंखे रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडल्यावर आपणही एक स्वतंत्र शिक्षण संस्था उभी करावी असे विचार त्यांच्या मनात वारंवार येऊ लागले. संस्था चालविण्याचा त्यांना रयत शिक्षण संस्थेत अनुभव मिळाला होता. संस्था स्थापनेच्या पार्श्वभूमीची माहिती देतांना श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे सचीव श्री.अभयकुमार साळुंखे संस्थेच्या [संस्कृती सन ८५-८६]या वार्षिकात म्हणतात.

> " भारतीय संस्कृतीमध्ये शिक्षणाचे स्थान अद्वितीय आहे शिक्षणातून माणसाच्या जीवनाची घडण होत असते. स्वातंत्र्य पूर्व काळात महाराष्ट्रात शिक्षणाचे जे कार्य चालू होते ते मर्यादित स्वरूपाचे होते. बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार करण्याची प्रेरणा कांही शिक्षणप्रेमी समाजोध्दारकांना झाली. त्यामध्ये बापूजीस साळुंखे एक आहेत." १३.

बापूजींच्या मनात नवीन संस्था स्थापन करण्याचा विचार घोळू लागला. यातूनच दिनांक १९/१०/१९५४ या दिवशी क-हाड येथील कृष्णा कोयना प्रिती संगमावरील योगेश्वर मुरलीधराच्या मंदिरात बापूजींनी आपल्या सर्व मित्रांना एकत्रित बोलावून बैठक घेतली. त्यामध्ये नवीन संस्था स्थापण्याचा संकल्प केला. त्यानंतर तासगांव तालुक्यातील तुरची येथे दिनांक १/११/१९५४ रोजी स्वामी रामानंद भारती यांनी संस्थेच्या ध्येय धोरणास शोभेल असे श्री स्वामी विवेकानंदाचे नांव सुचविले त्याप्रमाणे " श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था" असे संस्थेचे नामकरण झाले. त्यानंतर बापूजींनी संस्थेसाठी पुढील ध्येयावाक्याचा स्विकार केला.

संस्थेचे ध्येय -

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार" "या ब्रीद वाक्यात संस्थेचे ध्येय धोरण बापूजींनी सुत्ररूपाने ग्रंथीत केले आहे. हे सुत्र विशद करतांना प्राचार्य, सुरेश पाटील डॉ.बापूजी साळुंखे एक आगळे व्यक्तीमत्व या लेखात म्हणतात -

" ज्ञान म्हणजे सत्य, चारित्र्य , प्रामाणिकपणा, सेवा आणि त्याग या पंचशील तत्वाची जाणीव होणे व या तत्वांचे आचरण म्हणजेच विज्ञान, या ज्ञान आणि विज्ञानामुळे मनुष्य सुसंस्कारी होतो. शिक्षणाचे हे मूळ उद्दिष्ट बापूजींनी सांगितले आणि त्याचा प्रसार करण्यासाठी शिक्षण संस्थेची स्थापना केली. " १४.

बापूजींच्या जीवनावर गीता, उपनिषदे व स्वामी विवेकानंदाच्या शिकवणुकीचा प्रभाव पडला आहे. तसेच गांधीजींची साधी राहणी व उच्च विचारसरणी यांचे प्रत्यक्ष आचरण बापूजींनी केले आहे. त्यामुळे त्यांनी सुसंस्कारी शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला. समाजाचे जीवन कसे समृध्द होईल भौतिक व अध्यात्मिक जीवनात कसा समन्वय साधता येईल यांचाही विचार संस्थेच्या ध्येय धोरणात अनुस्यूत झाला आहे. आजच्या वैज्ञानीक युगात संस्थेच्या विविध शाखातून प्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापिठीय शिक्षणापर्यन्त ज्ञान विज्ञान व सुसंस्कारांचे शिक्षण दिले जात असून, त्यातूनच आजचा विज्ञाननिष्ठ समाज या घडविण्यास या संस्थेचे योगदान लाभले आहे. श्रमदानातून स्वावलंबन आणि शिक्षणातून समाजसेवा हे कार्यही संस्थेच्या संस्कृती केंद्रातून समाजाला लाभत आहे.

संस्थेची घटना -

बापूजींनी संस्थेचा कारभार विशिष्ट तत्वप्रणालीने व योग्य प्रशासकीय मार्गाने चालविण्यासाठी कायदेशीर घटना तयार केली. घटना तयार करण्याचे कामी शिक्षणाधिकारी श्री. पाटील आर. वाय. यांचे सहकार्य लाभले. ही घटना लोकशाही प्रधान असून त्यात आवश्यकतेनुसार वेळोवेळी फेरबदल करण्याची तरतूद आहे. संस्थेच्या आधिकार मंडळात सर्वसाधारण सभा, व्यावस्थापक मंडळ, विश्वस्त मंडळ, प्रत्येक शाखेसाठी स्थानिक सल्लागार समिती, बदली, बढती व शिस्तभंग समिती, संस्थेच्या कामाच्या व्यापक कार्यक्षेत्रानुसार कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, मराठवाडा, कोकण अशी विभागीय मंडळे स्थापन करण्यांत आलेली आहेत. घटनेत अकरा शैक्षणिक उद्दिष्टे व २७ मार्गदर्शक बंधनेही नमूद केली आहेत. बापूजी घटना तयार केल्यानंतर एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होवून शिक्षण प्रसार कार्य जून १९५५ मध्ये सुरु केले.

बापूजींनी माध्यमिक, तांत्रिक, उच्च, शिक्षक प्रशिक्षण इत्यादी स्तरावर शिक्षण प्रसाराचे काम मोठ्या प्रमाणात केले. तसेच विद्यार्थ्यांच्या राहाण्या, जेवण्याच्या सोयीसाठी माफक दरात एकंदर ३५ वसतीगृहे चालविली. महाराष्ट्र राज्यातील १० जिल्हयामध्ये एकूण २५९ विविध शाखा काढून अल्पावधीतच रयत शिक्षण संस्थेच्या बरोबरीने प्रचंड कार्य केले. बापूजींनी संस्थेसाठी आपले सर्वस्व आर्पण केले. संस्थेच्या विकासात सदोदीत लक्ष घातले. हे शिक्षण प्रसाराचे कार्य करीत असतांना अविरत नि अविश्रांत परिश्रमाचा परिणाम म्हणून शेवटी ते असाध्य अशा पार्किन्सस नावांच्या रोगाने आजारी पडले. ६ वर्षे ते या रोगाशी झुंज देत होते. शेवटी प्रकृती अचानक बिघडल्याने ८ ऑगस्ट १९८७ रोजी त्यांचा देहांत झाला

बापूजींच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतच्या यशस्वी जीवनाची वाटचाल कशी होत गेली. हे दर्शविण्यासाठी संक्षिप्त स्पाने त्यांच्या जीवनातील कांही ठळक घटनांचा उल्लेख खालीलप्रमाणे केला आहे.

## २.८ शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनातील कांही ठळक घटना.

१९१९ : ९ जून रामापूर ता. पाटण येथे जन्म.

१९२० : आईचा मृत्यू.

१९२६ : शाळेत पहिले पाऊल.

१९३१ : वडील ज्ञानोजी साळुंखे यांचा मृत्यू.

१९३३ : ७ वी च्या परिक्षेत उत्तीर्ण.

१९४० : १५ डिसें. बेळगांव येथे विवाह.

१९४० : सोंडूर संशोधन व राजगुरु.

१९४२ : गांधीजींच्या कार्याने प्रभावित गांधीजीची मुरली कविता लिहली व क्रांती लढयात प्रवेश केला.

१९४५ : जिल्हा विद्यार्थी कॉंग्रेसचे अध्यक्ष, बी.ए. परीक्षा उत्तीर्ण.

१९४८ : १ जाने. महात्मागांधी यांना कर्मवीर सत्कारास प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यास दिल्लीकडे रवाना.

१९४८ : ९ जाने. महात्मा गांधीजींच्या हस्ताक्षरातील संदेश आणला.

१९४८ : सातारा जिल्हयाचा क्रांती इतिहास हे पुस्तक लिहले.

१९४८ : रयत शिक्षण संस्थेत प्रवेश.

१९४९ : बी.टी. परीक्षा पास झाले.

१९५४ : कराडच्या मुरलीधर मंदीरात १९ ऑक्टोबर नवीन शिक्षण संस्था स्थापण्यासंबंधी बैठक घेतली.

१९५४ : १ नोव्हें. संस्थेचे नामकरण " श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' तासगांव तालुक्यातील तुरची या गांवी केले.

१९५५ : ३१ मे रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडले.

१९५५ : संस्थेची घटना तयार केली. संस्थेचे ब्रीद वाक्य तयार केले व संस्थेसाठी प्रार्थना तयार केली.

१९५५ : ६ जून संस्थेच्या ५ संस्कृतीक केंद्राचा शुभारंभ.

१९५९ : २० जून मराठवाडयात आर.पी.कॉलेज हया पहिल्या महाविद्यालयाची स्थापना.

१९५६ : छत्रपती शाहू महाराज हायस्कूल कोल्हापूरच्या इमारतीच्या पत्र्यात पडून अपघात.

१९६१ : ९ जून रोजी विद्यार्थ्यांनी बापूजींचा साजरा केलेला पहिला वाढदिवस.

१९६८ : १३ जाने. कराड प्रकरणी चौकशी समिती.

१९६८ : १४ ऑगष्ट प्राणघातक हल्ले.

१९६८ : १८ ऑगष्ट लवादाची नेमणूक.

१९६९ : ६ मार्च प्राणांतिक उपोषणाची घोषणा.

१९६९ : १६ मार्च यशवंतराव चव्हाणांची भेट.

१९६९ : २१ मार्च सातारा येथे उपोषणास आरंभ.

१९७१ : १२ मार्च चक्री उपोषण समाप्त.

१९७३ : २२ जानेवारी गुरुदक्षिणा अर्पण समारंभ.

१९७५ : ४ जुलै तासगांव नगरपालिके तर्फे सत्कार.

१९७६ : १५ ऑक्टो. सेवकांच्या पत संस्थेची स्थापना.

१९८० : १० आक्टो. जोहे येथे शिक्षणमंत्री डॉ.बळीराम हिरे यांचे हस्ते सत्कार.

१९८१ : २६ मार्च संस्थेच्या वतीने मा. वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ व ५ लाखाची थैली अर्पण.

१९८२ : २७ एप्रील सातारा जिल्हयाच्या वतीने ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते सत्कार व मानपत्र.

१९८३ : सांगली जिल्हयातर्फे सत्कार व पुरस्कार.

१९८४ : दलित मित्र पुरस्कार शासनातर्फे प्रदान.

१९८६ : ११ फेब्रु. रोजी शिवाजी विद्यापीठा तर्फे केंद्रीय मंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांचे हस्ते डी. लिट. पदवी बहाल.

१९८७ : ८ ऑगष्ट निवासस्थानी कोल्हापूर येथे मृत्यु.

## २.९ समारोप -

बापूजींच्या जीवन वृत्तांताचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला आहे.

बापूजींचे बालपण, शिक्षण, व लहानपणी त्यांच्यावर झालेले संस्कार, त्यांचे कौटूंबिक जीवन, बापूजींचा सामाजिक व राजकीय कार्यातील सहभाग, तसेच त्यांनी रयत शिक्षण संस्थेसाठी केलेले कार्य याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. त्यानंतर बापूजींनी स्वतंत्र अशा "श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची" स्थापना केली. तसेच त्यांच्या जीवनातील कांही ठळक घटना विषयी सारांश रुपाने माहिती या प्रकरणात दिली आहे.

बापूजींच्या कार्याचे महत्व समजण्यासाठी, महाराष्ट्रातील विसाव्या शतकातील सामाजिक व शैक्षणिक पार्श्वभूमीची माहिती पुढील प्रकरण तीन मध्ये दिली आहे.

::::::::::::

## सं द र्भ


१] गजानन सुर्वे : शिक्षण महर्षि परमपूज्य बापूजी साळुंखे: व्यक्ती आणि कार्य.
कोल्हापूर १९८१, पृष्ठ क्र. ४.

२] गजानन सुर्वे : तत्रैव. पृष्ठ क्र. १३.

३] बी.डी.पाटील : डॉ.बापूजी साळुंखे व्यक्ती कार्य आणि आठवणी
बेळगांव, मनीषा प्रकाशन, १९८६, पृष्ठ क्र. २०.

४] बी.डी.पाटील : तत्रैव पृष्ठ क्र. २२.

५] जे.बी.कुंभार : चैतन्यमय व्यक्तीमत्व: शिक्षण महर्षि डॉ.बापूजी
कोल्हापूर, सहयाद्री प्रकाशन, ९ जून १९८८
पृष्ठ क्र. १.

६] बी.डी.पाटील : डॉ.बापूजी साळुंखे: व्यक्ती कार्य आणि आठवणी
उपरनिर्दिष्ठित पृष्ठ क्र. २४.

७] संभाजीराव पाटणे : शिक्षण महर्षि बापूजी
सातारा, सुशील प्रकाशन, १९८२, पृष्ठ क्र. ७.

८] एस्.एस्. भोसले : महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा.
कोल्हापूर, बापूजी साळुंखे षष्ठ्यब्दपूर्ती समिती, १९८०
पृष्ठ क्र. ६७३.

९] गजानन सुर्वे : शिक्षण महर्षि परमपूज्य बापूजी साळुंखे व्यक्ती व कार्य.
उपरनिर्दिष्ठित पृष्ठ क्र.

१०] संभाजीराव पाटणे : शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे.
उपरनिर्दिष्ठित पृष्ठ क्र. १०.

११] एस्.एस्. भोसले : महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा
पृष्ठ क्र. ६७७.

१२] डॉ.एस्.एस्. भोसले : तत्रैव पृष्ठ क्र. ६७७.

१३] अभयकुमार साळुंखे : संस्कृती [सन १९८५-८६] वार्षिक अंक चवथा
कोल्हापूर, श्री स्वामी विवेकानंद संस्था,प्रकाशन १९८६
पृष्ठ क्र. ५.

१४] राम होगले : साप्ताहीक रामप्रताप: बापूजी साळुंखे विशेषांक
कराड, आझाद प्रकाशन, १९८७, पृष्ठ क्र.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR